# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/११/२०२५ (गुरूवार )**

---

## अवैधरित्या सुपारी (अरेका नट) ची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई, ३ वाहने आणि ३७,०५० किग्रॅ सुपारी किंमती ७९ लाख १० हजार १७५ रूपयांचा मुद्देमाल जप्त, सावनेर पोलीसांची कामगिरी

दिनांक १२/११/२०२५ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदाराकडून खात्रीशिर माहीती मिळाली की मौजा हेटी शिवारातील श्री विर तेजाजी राजस्थानी भोजनालय येथे तिन ट्रक मध्ये सुपारी (अरेका नट ) भरून दिल्लीला नेत आहेत. अशा माहीतीनुसार सावनेर पोलीसांनी तात्कळ घटनास्थळी पांढूर्णा ते सावनेर हायवे वरील श्री विर तेजाजी राजस्थानी भोजनालय, हेटी येथे जावुन पाहणी केली असता तिथे तिन ट्रक उभे होते. सदर ट्रकचे चालक यांना सदर ट्रक मध्ये काय आहे? याबाबत विचारले असता त्यांनी ट्रक मध्ये सुपारी असल्याचे कबूल केले. त्यानंतर सदर ट्रकची पाहणी केली असता १) अशोक लेलॅंड कंपनी ट्रक क्र. के ए. १९ ए. एफ. ४२५५ मध्ये १२,३५० किग्रॅ सुपारी २) अशोक लेलॅंड कंपनी . के ए. १९ ए. ई ४९४५ मध्ये १२,३५० किग्रॅ सुपारी ३) आयशर कंपनीच ट्रक क्रं. के ए. १९ ए. ई ९४३८ मध्ये १२,३५० किग्रॅ सुपारी माल भरून आढळून आला व तिन्ही ट्रक मधील सुपारी (Arecanut) एकूण वजन ३७,०५० किग्रॅ किंमत ७९,१०,१७५/—रूपये मिळुन आले. नमुद तिन्ही वाहनांमधुन पंचासमक्ष सुपारी चे सॅम्पल फॉरेन्सिक परिक्षण करण्यासाठी पाठविण्यात आले तसेच नमुद तिन्ही वाहन आणि मुद्देमाल अन्न व औषधी प्रशासन अधिकारी, नागपूर यांना पुढील कार्यवाही करणे कामी ताब्यात देण्यात आले आहे. वाहन चालकांची नावे अनुक्रमे १.मोहम्मद शरीफ, वय ४४ वर्षे, रा. मंगलोर, २. इलियाज

अहमद, वय ४८ वर्षे, रा पाडानगड्डी, दक्षिण कन्नडा, राज्य कर्नाटक, ३.मोहम्मद इब्राहिम मुक्तार, वय २६ वर्षे, रा बंतवाल, राज्य कर्नाटका अशी आहे.








## अवैध रित्या अंमलीपदार्थ गांजा बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, १ किलो १७६ ग्रॅम गांजा जप्त नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बोरी** :— दिनांक १३/११/२०२५ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, पोलीस स्टेशन बोरी हद्दीत बोरी ते नागपुर महामार्गावरील बोरखेडी फाटक रेल्वे पुलाखाली एक महीला आरोपी गांजा या अंमली पदार्थाची विक्री करण्याकरीता येणार आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे नमुद पथकाने सदर माहीती बोरी पोलीसांना देवुन बोरी पोलीसांसह संयुक्त कारवाई करत घटनास्थळावर सापळा रचुन नमुद महीला आरोपी हीचे ताब्यातुन १.१७६ किलोग्रॅम गांजा सदृश्य पदार्थ हस्तगत केला. पोलीसांनी पंचासमक्ष १.१७६ किलो ग्रॅम गांजा किंमती ४२,२५०/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला.

नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन बोरी येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.


voltage

# आगामी निवडणुक दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत काढण्यात आले रूट मार्च

आगामी नगर परिषद/नगर पंचायत निवडणुक २०२५ असल्याने नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत नमुद निवडणुक कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता खालील प्रमाणे रूट मार्च घेण्यात आले.

**पोलीस स्टेशन खापा :— पोलीस स्टेशन खापा अंतर्गत** दिनांक १३/११/२०२५ रोजी रूट मार्च घेण्यात आला. नमुद रूट मार्च पोलीस स्टेशन खापा येथुन सुरू करून खापा शहरात महत्त्वाच्या चौकातुन घेण्यात आला. सदर रूट मार्च मध्ये श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग , (प्रभार सावनेर उपविभाग) सहा. पोलीस निरीक्षक श्री किशोर भुजाडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन खापा यांच्यासह पोलीस स्टेशन खापा येथील अधिकारी अंमलदार , दंगा नियंत्रण पथक चे अंमलदार आणि गृहरक्षक हजर होते.

**पोलीस स्टेशन उमरेड :— पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत** दिनांक १४/११/२०२५ रोजी रूट मार्च घेण्यात आला. नमुद रूट मार्च पोलीस स्टेशन उमरेड ते भिसी नाका चौक ते इतवारी मार्केट ते जिवन विकास चौक ते पोलीस स्टेशन उमरेड या मार्गाने घेण्यात आला. पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन उमरेड यांच्यासह पोलीस स्टेशन उमरेड येथील अधिकारी अंमलदार , दंगा नियंत्रण पथक चे अंमलदार आणि गृहरक्षक हजर होते.




साई ज्वेलर्स
MOBILE WORLD
11/14/25
13:21

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## २२ जनावरांची सुटका, रामटेक पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक १३/११/२०२५ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी चेक पोस्ट कांद्री मनसर ता. रामटेक नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान  आयशर वाहन क्रमांक एम. एच. २० जी. झेड ३९८० येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबविले वाहनात १) चालक आरोपी फैजान खान हबीब खान,रा. बोरदई ,शिवनी, जि. शिवनी, राज्य. मध्यप्रदेश  २) क्लिनर इरसाद फैज मोहम्मद खान,रा. देरापूर जि.कानपूर राज्य उत्तरप्रदेश आणि ३) वाहन मालक आरोपी नजीम अहमद कुरैशी रा. बोरदई ,शिवनी जि. शिवनी, राज्य. मध्य प्रदेश  हे मिळुन आले. पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता म्हशी, हेले असे एकुण २२ जनावरे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून आयशर वाहन क्रमांक एम. एच. २० जी झेड ३९८० किंमती २०,००,०००/— रूपये. व म्हशी, हेले असे एकुण २२ जनावरे किंमती ६,६०,००० /— रूपये असा एकुण किंमती २६,६०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**सदर प्रकरणी वर नमुद तिन्ही आरोपी यांच्या विरूध्द प्रण्याचा छळ प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या १२ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक १३/११/२०२५ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की मौजा माहुझरी शिवार येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता आरोपी नामे १) शिवराज वासुदेव बावनकर, वय ४० वर्ष, रा. पंचदीपनगर अनुभव कॅलनी, सोमलवाडा, नागपुर २) गणेश शिवाजी बोरकर, वय ४० वर्ष, रा. पार्वती नगर, नागपुर ३) भुषण दिनेश देव्हारे, वय ४० वर्ष, रा. दिघोरी, नागपुर ४) अब्दुल गुलाम साबीर अब्दुल रहीम, वय ४९ वर्ष, रा. गाजीपेठ ,नागपुर ५)अनिल धनसुलाल नंदवसी, वय ४९ वर्ष, रा. भवानी मंदीर जवळ, पारडी, नागपुर ६) प्रवीण विष्णु परिहार, वय ४६ वर्ष, रा. गोळीबार चौक, नागपुर ७) नितीन विष्णु परिहार, वय ४४ वर्ष, रा. गोळीबार चौक नागपुर ८) सचीन समाधान डोंगरदिवे, वय ३८ वर्ष रा सुरेन्द्रगड बगजरंग चौक नागपुर ९)आशिष द्वारकाप्रसाद साहु वय ३२ वर्षे रा. पिपळा फाटा बस स्टॉप जवळ हुडकेश्वर नागपुर १२) सुमीत बाबाराव डोंगरदिवे, वय ३३ वर्ष, रा. सुरेन्द्रगड, हजारी पहाड नागपुर ११) रितेश सजय पांडे, वय ३२ वर्ष, रा. तिरंगा चौक, सक्कदरा, नागपुर १२) राहुल महाविर जांगीळ, वय ३२ वर्ष, रा. ओमकार लॅान जवळ, दिघोरी, नागपुर हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. **आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तास पत्ते व रोख रक्कम ३२,४३०/— रूपये जप्त करण्यात आले आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे १२ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने